## संक्षिप्त...

### डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांची कामे रखडली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जुन : जळकोट तालुक्यात पेट्रोल डिझेल तसेच सीएनजीची टंचाई भासत आहे. शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरला डिझेल मिळेनासे झाले आहे. त्यामुळे शेतकरी संताप व्यक्त करीत आहेत. शेतीची कामे खोळंबली आहेत. सध्या जळकोट तालुक्यात मशागतीची कामे सुरू आहेत. यासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टरचा वापर करीत असतात परंतु ट्रॅक्टरला डिझेल मिळत नसल्यामुळे पेरणीपूर्व मशागतीची कामे रखडली आहेत.

अगदी काही दिवसांनंतर मृग नक्षत्राचे आगमन होते. एकदा का मृग नक्षत्राचे आगमन झाले की कधीही पेरणी लागू शकते. यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे करण्यासाठी लगबग सुरू केली आहे. सध्या शेतकऱ्याजवळ बैल जोडीचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे शेतकरी हे ट्रॅक्टरद्वारेच पेरणीपूर्व मशागतीची कामे करीत आहेत मात्र ट्रॅक्टरला डिझेल मिळत नसल्यामुळे शेती कामासाठी ट्रॅक्टर उपलब्ध होण्यास अडचण निर्माण झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांची कामे रखडली आहे. पेट्रोल पंपावर डिझेलमिळत नसल्यामुळे इतर वाहनांनाही मोठा फटका बसत आहे. डिझेलवर चालणाऱ्या कार तसेच ट्रक यांना मोठी अडचण निर्माण झाली आहे.

जळकोट तालुक्यात अनेक पेट्रोल पंपावरील डिझेलचा साठा संपला आहे. डिझेलचे टँकर आले तरी दोन तासांत टँकर संपून जात आहे.

### भटक्या श्वानांच्या बंदोबस्ताच्या सूचना

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जून : प्रभाग क्रमांक ९ मध्ये भटक्या श्वानांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दीनानाथनगर, सावे वाडी येथे भटक्या श्वानांमुळे झालेल्या अपघाताची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर येताच प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेविका तबस्सुम मुख्तार शेख यांनी दीनानाथनगर, सावेवाडी परिसरात जाऊन श्वानांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांची आस्थेने चौकशी केली तसेच संबंधित अधिकाऱ्यांना भटक्या श्र्वानांच्या बंदोबस्ताबाबत तातडीने प्रभावी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

भटक्या श्वानांच्या हल्ल्यामुळे जखमी झालेले विजय गिल्डा यांच्या घरी जाऊन त्यांच्या दुखापतीची विचारपूस करण्यात आली. तसेच त्यानंतर तापडिया हॉस्पिटल येथे जाऊन अपघातग्रस्त गुलाबचंद तापडिया यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची माहिती जाणून घेतली व कुटुंबीयांना धीर दिला. यावेळी तबस्सुम मुख्तार शेख यांनी प्रशासनाकडे नाराजी व्यक्त केली. भटक्या श्र्वानांचा बंदोबस्त, कचरा व्यवस्थापन, लाईट, पाणीपुरवठा, नाल्यासफाई यासारख्या सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर येत असून प्रशासनाने याबाबत गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# विमानतळाच्या विकासासाठी ५६.७४ कोटींचा निधी मंजूर

## मुख्यमंत्र्यांनी लातूरकरांना दिलेला शब्द पाळला आ. अभिमन्यू पवारांचा पाठपुरावा यशस्वी

तभा वृत्तसेवा

औसा दि. २ जुन : लातूरच्या विकासासाठी आणि हवाई संपर्क व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्य शासनाने लातूर विमानतळाच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल ५६.७४ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे. तसेच विमानतळाच्या नियमित परिचालनासाठी प्रतिवर्ष ३७.७८ लाख रुपयांच्या खर्चालाही मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरकरांना दिलेला शब्द पाळत हा निर्णय घेतला असून, आमदार अभिमन्यू पवार यांनी गेल्या तीन ते चार वर्षांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.

लातूर विमानतळ कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी विधिमंडळात सातत्याने आवाज उठविला होता. याशिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह संबंधित विभागांकडे वारंवार पाठपुरावा करून निधी मंजूर करण्याची मागणी केली होती. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने लातूर विमानतळाच्या



विकासाचा मार्ग आता मोकळा झाला आहे.मंजूर निधीतून विमानतळावर अनेक महत्त्वपूर्ण विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. यामध्ये रनवे एंड सेफ्टी एरिया (ठएड-) विकसित करणे, विमानतळ परिसर सुरक्षित करण्यासाठी ३.३८ किलोमीटर लांबीची संरक्षण भिंत उभारणे, ४.५ मीटर रुंदीचा आणि ८ किलोमीटर लांबीचा परिघीय रस्ता निर्माण करणे, धावपट्टीचे (रनवे) मजबुतीकरण व सुधारणा करणे, रात्रीच्या उड्डाणांसाठी आवश्यक नाईट लँडिंग सुविधा उपलब्ध करणे, अग्निशमन केंद्र, आपत्कालीन सेवा केंद्र आणि अँटी-हायजॅकिंग रूमचे नूतनीकरण करणे तसेच अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे आदी कामांचा समावेश आहे.

या सुविधा पूर्ण झाल्यानंतर लातूर विमानतळाची सुरक्षा, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधा मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत. विशेषतः नाईट लँडिंग सुविधेमुळे भविष्यात रात्रीची विमानसेवा सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार असून लातूरचा देशातील प्रमुख शहरांशी हवाई संपर्क अधिक सक्षम होणार आहे.लातूर विमानतळाच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एप्रिल २०२५ मध्ये उच्चस्तरीय बैठक घेऊन प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेतला होता. तसेच मार्च २०२६ मध्ये सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात लातूर विमानतळावर रात्रीच्या उड्डाणांसाठी आवश्यक सुविधा उभारण्याची घोषणा केली होती. त्या घोषणेची अंमलबजावणी करत शासनाने आता निधी मंजूर केल्याने विमानतळ विकासाच्या कामांना प्रत्यक्ष गती मिळणार आहे. राज्य शासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे लातूरच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. विमानतळावरील सुविधा विकसित झाल्यानंतर उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य आणि पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच गुंतवणूकदारांसाठी लातूर अधिक आकर्षक ठरणार असून जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला नवे बळ मिळणार आहे. नागरिकांना दर्जेदार हवाई सेवा उपलब्ध होण्याबरोबरच मराठवाड्याच्या विकासातही या निर्णयाची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# गायीला राष्ट्रीय पशू म्हणून घोषित करा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जून : गायीला राष्ट्रीय पशू म्हणून जाहीर ये करण्याच्या मागणीचे निदेदन येथील शेर-ए-हिंद शहीद न टिपू सुलतान संघटनेच्या वतीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे, काही राजकीय पक्ष आणि संघटनांकडून गायीच्या मुद्याचा - वापर करून समाजातील दोन समुदायांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच न काही तथाकथित गोरक्षकांकडून कायदा हातात घेऊन सर्वसामान्य नागरिक तसेच विशिष्ट समुदायातील लोकांना त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



या पार्श्र्वभूमीवर केंद्र सरकारने विशेष कायदा तयार करून गायीला राष्ट्रीय पशू घोषित करावे आणि तिच्या शहीद टिपू सुलतान संघटनेचे राष्ट्रपतींना निवेदन संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी शासनाने घ्यावी, अशी मागणी संघटनेने राष्ट्रपतींकडे केली आहे. यामुळे सामाजिक सलोखा टिकून राहण्यास मदत होईल तसेच गायीच्या संरक्षणासाठी एकसमान आणि कायदेशीर व्यवस्था निर्माण होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनावर शेर-ए-हिंद शहीद टिपू सुलतान संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बशीर शेख, सचिव मुस्तफा शेख, लातूर तालुकाध्यक्ष इसहाक कुरेशी, सोहेल कुरेशी, इम्रान झारेकर, रिजवान कुरेशी आणि जुनेद कुरेशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### संवेदना पाल्सीत सेन्सरी पार्कचे भूमिपूजन

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२ जून : हरंगुळ येथील संवेदना दिव्यांग प्रकल्पातील दिव्यांगांसाठी सेन्सरी पार्कचे भूमिपूजन दिव्यांग कल्याणमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते रविवारी ( दि.३१) करण्यात आले.

यावेळी दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे आयुक्त सत्यजित बडे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संजय अग्रवाल होते. जनकल्याण समितीचे दिव्यांग प्रकल्पाचे कार्य समर्पित भावनेने कार्यरत आहे. दिव्यांग व्यक्ती हा समाजातील उपेक्षित आहे. अशा वंचित व उपेक्षित विषयांकरिता जनकल्याण समिती कार्य करीत आहे. हे पाहून मनस्वी आनंद झाला, असे ते अतुल सावे यांनी सांगितले.

यावेळी आयुक्त बडे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक शाळेचे अध्यक्ष ॲड. श्रीराम देशपांडे यांनी केले. डॉ. योगेश निटुरकर यांनी वर्षभराचा आढावा सादर केला.

यावेळी केशव तिपनबोणे, डॉ. बाळासाहेब चव्हाण, विनायक डंबीर, सुनील वसमतकर, शिरीष कुलकर्णी, डॉ. राजेश पाटील, ॲड. श्रीराम देशपांडे, दिव्यांग सक्षमीकण विभागाचे अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, आयुक्तालयाचे भारत कांबळे, उपायुक्त माळवदे, संघाचे शहर संघचालक उमाकांत मद्रेवार, निवासी विद्यालयाचे अध्यक्ष प्रकाश लातुरे, प्रदीप पराडकर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. मयुरी बिल्लावार, राजू गायकवाड यांनी केले. राहुल देशपांडे यांनी आभार मानले.

# संच मान्यता मसुद्याविरोधात शिक्षकांचा एल्गार

# शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर मसुद्याची होळी

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि.२ जून : राज्य अनुदानित व अंशतः अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांतील हजारो शिक्षकांचा कार्यभार कमी करणाऱ्या संच मान्यता (ड्राफ्ट) मसुद्याविरोधात शिक्षक संघटनांच्यावतीने उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष प्रा शिवराम सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी मसुद्याची प्रतीकात्मक होळी करून शासनाच्या निर्णयाचा निषेध नोंदविण्यात आला.



आंदोलनात विभागीय अध्यक्ष तथा सचिव प्रा. बाळासाहेब बचाटे, धाराशिव जिल्हाध्यक्ष प्रा. रमेश नन्नावरे, नांदेड जिल्हाध्यक्ष प्रा. संभाजी वडजे, सचिव नारायण गाढवे, जुक्टा मार्गदर्शक प्रा शिवाजीराव शिंदे, प्रा. मुकुंद बोखारे, लातूर उपाध्यक्ष प्रा. मारोती सूर्यवंशी, यांच्यासह विभागातील हजारो शिक्षक सहभागी झाले होते.

गेल्या ५० वर्षांपासून कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यता शाळा संहिता, सामाजिक व भौगोलिक परिस्थिती तसेच शासनाच्या विविध आदेशांनुसार दिल्या जात होत्या मात्र, सन २०२५-२६ च्या संच मान्यतेसाठी ऑनलाईन प्रक्रियेदरम्यान तयार करण्यात आलेल्या मसुद्यात प्रचलित निकषांना बगल देण्यात आली आहे. ज्युक्टाच्या पदाधिकाऱ्यांनी शासनावर मोफत शिक्षण व्यवस्थेस कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करीत हा मसुदा तातडीने मागे घेण्याची मागणी केली. तसेच संच मान्यतेतील त्रुटी दूर करून प्रचलित निकषांनुसार मान्यता देण्यात यावी, यावर्षीची संच मान्यता शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावर ऑफलाईन पद्धतीने करण्यात यावी,

विषयनिहाय कार्यभार, प्रात्यक्षिक व स्वाध्यायासाठी आवश्यक किमान विद्यार्थी संख्या ग्राह्य धरण्यात यावी, तुकड्या कायम ठेवण्यासाठीचे विद्यमान निकष लागू करावेत तसेच प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची संख्या ग्राह्य धरावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

या आंदोलनात प्रा. सी.जी. पाटील, कार्याध्यक्ष प्रा. संजय भंडा रे, सहसचिव प्रा आर.पी. केंद्रे, प्रा. संतोष हुडगे, प्रा. गोविंद पडिले, कार्यालयीन सचिव प्रा. राजेंद्र नागरगोजे, कोषाध्यक्ष प्रा. एकनाथ पाटील, प्रा. विनोद पुरी, प्रा. शिवराज मिटकरी, प्रा. लहुकांत शेवाळे, प्रा. संजय बिराजदार, प्रा. राजकुमार हलकुडे, प्रा. अंगद बोबडे, प्रा. किशन गायकवाड, प्रा. प्रकाश पाटील, प्रा. अरुण महाळंकर, प्रा. गजानन तनशेटे, प्रा. रवद्रिं सुरवसे, दादासाहेब लोंढे, प्रा. दयानंद काळे, प्रा. गोविंद सूर्यवंशी, प्रा. महेश देशमुख, शिंदे यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांच्या या तीव्र आंदोलनामुळे संच मान्यता मसुद्याबाबत शासनाची भूमिका काय राहणार, याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

### काँग्रेसतर्फे होळकर जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि.२ जून : येथील काँग्रेसच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. काँग्रेसचे शहराध्यक्ष नितीन मोटेगावकर यांच्या हस्ते शहर कार्यालयात रविवारी (दि. ३१) होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी रेणापूर बाजार समितीचे उपसभापती ॲड. शेषराव हाके-पाटील व रेणुकादेवी ट्रस्टचे मनोहर व्यवहारे यांनीही अभिवादन केले. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे, नगरसेवक पद्मसिंह पाटील, सचिन मोटेगावकर, भूषण पनुरे, संतोष शिंदे, माजी सरपंच विठ्ठल कटके, पंचायत समिती सदस्य उद्धव जाधव, बालाजी गोटके, शमियोद्दीन शेख, उमेश हुडे, जगन्नाथ गाडे, प्रा. किशोर चक्रे, शिवाजी आकनगिरे, रोहित गिरी, सचिन इगे, सूरज वंगाटे, भीमाशंकर कोरे, अमोल बंडे, बाळू पटनुरे, मदन पांचाळ, सुरेश फुलारी, संतोष कातळे यांच्यासह मान्यवरांनी होळकर यांना अभिवान केले.

### जळकोट तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे उपोषण



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जून : जळकोट तालुक्यातील रावणकोळा येथील ७ ते ८ शेतकऱ्यांनी त्यांची शेती टि.एस. विंड पॉवर डे. या कंपनीकडे भाडे तत्त्वावर दिली होती मात्र कंपनीने एका वर्षामध्येच करार मोडल्याची तक्रार करीत, आमची फसवणूक केली असून आम्हाला न्याय मिळावा, आम्हाला ठरल्याप्रमाणे जमिनीची रक्कम मिळावी अशी मागणी करीत रावणकोळा येथील शेतकऱ्यांनी जळकोट तहसील कार्यालयासमोर या सोलर कंपनीच्या विरोधात आमरण उपोषण सुरू केले आहे.

शेतकरी केलेल्या आरोपानुसार मॅनेजर जाकीर शेख हे आमच्याकडे येऊन आमच्या जमिनी २८ वर्षे भाडेतत्वावर टि.एस. विंड पावर डे. या कंपनीच्या नावाने सोलार प्लॉन्टसाठी सन २०२५ मध्ये आमच्या जमिनी (भाडेतत्वावर) रजिट्री ऑफिसमध्ये मॅनेजर जाकिर शेख हे स्तवः येऊन त्यांनी टि.एस. विंड पावर डे. 'कंपनीच्या नावाने भाडेतत्वावर जमिनी घेतल्या. त्यानंतर भाडेतत्वावानुसार आम्हाला भाडे ठरले होते. त्याप्रमाणे सन २०२५-२६ चे भाडे चेकद्वारे मिळाले आहे.

**शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा इशारा**

या प्रकरणी मॅनेजर व टि.एस. विंड पावर डे. या कंपनीवर फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा (४२०) दाखल करावा. तसचे सदरील कंपनीस दरवर्षी कराराप्रमाणे ठरलेले भाडे देण्याचे आदेश द्यावेत व आम्हा शेतकऱ्यांना न्याय मिळावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा मधुकर व्यंकटराव हुंडेकर, पुंडलिक बाजीराव डावळे, मारोती गंगाधर जगदरे, तानाजी कोंडीबा डावळे, विष्णुकांत तानाजी डावळे, शिवाजी तानाजी डावळे, माधव लक्ष्मण वाघमारे या शेतकऱ्यानी दिला आहे.

त्यानंतर आमच्या शेतात सदरील मॅनेजर जाकिर शेख यांनी झाडे तोडली व आम्हा सर्व शेतकऱ्यांच्या जमिनी लेवल केल्या व तुमचे करारानुसार भाडे सुरू झाले असे सांगितले.

त्यानंतर शेतकऱ्यांनी सन २०२६-२७ चे भाडे मागण्यासाठी मागील ४ महिण्यापासून त्यांच्या कार्यालयात जात होतो. मागील दोन महिण्याखाली तुम्हाला भाडे टाकतो म्हणून शेतकऱ्याकडून आधार, पॅन, बैंकपास बुक व इतर कागदपत्रे घेतली परंतु आज दि.२० मे २०२६ रोजी टि.एस. विंड पावर डे. कंपनीच्या

कार्यालयात सर्व शेतकरी गेले असता मॅनेजर जाकिर शेख हे कार्यालयात उपस्थित नव्हते. यावेळी शेतकऱ्यांनी त्यांना फोन केला असता सदरील मॅनेजर जाकिर शेख यांनी तुमचे पैसे देत नाही, आता आम्हाला लिजने घेतलेल्या तुमच्या जमिनीची गरज नाही. लिज रद्द करा असे सांगितले.

# सांडपाणी : गटारी तुंबल्या, व्यवस्था करा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जून : शिरूर अनंतपाळ शहरातील मध्यवर्ती भागातील तुंबलेल्या गटारीची तात्काळ स्वच्छता व सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था करण्यात यावी व नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या विषयी तात्काळ कार्यवाही करावी, याबाबत नगर पंचायतचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे नागरिकांनी मागणी केली आहे.



शिरूर अनंतपाळ शहरातील मुख्य बाजारपेठ, अंगणवाडी, नगरपंचायतीचे व्यापारी संकुल तसेच श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील गटार पूर्णपणे तुंबलेली असून परिसरात मोठ्या प्रमाणात घाण, प्लास्टिक कचरा व सांडपाणी साचलेले आहे. सदर गटारीचे पाणी पुढे जाण्यास कोणतीही योग्य व्यवस्था नसल्याने सांडपाणी साचून दुर्गंधी पसरली आहे.

या परिसरात नागरिकांची मो-ठ्या प्रमाणात वर्दळ असते. लहान मुले, महिला, व्यापारी व जेष्ठ नागरिकांना या अस्वच्छतेमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आ हे. तसेच डासांचे प्रमाणही वाढून नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता असल्याने तुंबलेली गटार तातडीने स्वच्छ करण्यात यावीत, साचलेला कचरा व प्लास्टिक हटविण्यात यावा, सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी, परिसरात नियमित स्वच्छता व फवारणी करण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांकडून पाहणी करून जबाबदारी निश्र्चित करण्यात यावी.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी अशी अस्वच्छ व धोकादायक परिस्थिती निर्माण होणे अत्यंत दुर्दैवी बाब आहे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या प्रश्र्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी शहराध्यक्ष संदिप धुमाळे, किराणा मालाचे व्यापारी बालाजी यरमलवार, जयलिंग कोरे, तानाजी सुरवसे, राहूल तांबोळकर, सोमनाथ खंडापुरे, तुषार मादळे, विरप्पा खंडापुरे, प्रशांत यरमलवार, अजय मंठाळे इत्यादी नागरिकांच्या स्वाक्षरी आहेत.

### जादूटोणा करणाऱ्या भोंदूवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जून : नागरिकांना अंगारा लावून, यंत्र बांधून समाजात अंधश्रध्दा पसरविणाऱ्या भोंदूबाबाविरोधात जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लातूरजवळील खोपेगाव शिवारातील सैलानी बाबा दर्गाह येथे त्या भोंदूबाबावर ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी मारोती चंदरराव मोरे (रा. खोपेगाव, ता. लातूर) याच्याविरोधात लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या फिर्यादीवरून गुरनं. १०६/२६ कलम ३ महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडीय – विभाग)

२०२६एमएजी/कावि.

ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.

श्री. दयानंद तुकाराम जाधव विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बिबराळ ज्याअर्थी नामे. दयानंद तुकाराम जाधव रा. बिबराळ ता. शिरूर अ. रोजी जि. लातूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. १०/०६/१९९५ मौजे. बिबराळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार दयानंद तुकाराम जाधव रा. बिबराळ यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या/स्वतः जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय बिबराळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे दयानंद तुकाराम जाधव रा. बिबराळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १०/०६/१९९५ रा. बिबराळ रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे दयानंद तुकाराम जाधव रा. बिबराळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत पुढील १५दिवसानंतर आदेश देण्यात येईल.

स्वाक्षरीत

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## खामसवाडीत अहिल्यादेवी होळकर यांना ठिकठिकाणी अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२ जून -**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती खामसवाडी येथे विविध ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावातील गुणवंत व विविध क्षेत्रांत यश संपादन केलेल्या युवा-युवतींचा सत्कार करण्यात आला.

मल्हार प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष ज्ञानेश्वर बंडगर यांच्या हस्ते शिवाजी महाराज चौकातील अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी समाज कल्याण सभापती विश्वास कोकणे, सरपंच अमोल पाटील, भाजपा नेते संजय पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात विश्वजीत शेळके (महाराष्ट्र ग्रामीण बँक), अमृता यादव (भूमि लेख अधिकारी, बुलढाणा), काजल जाधव (पुणे पोलीस) आणि पृथ्वीराज कदम (एचडीएफसी बँक) यांचा विविध पदांवरील निवडीबद्दल सत्कार करण्यात आला.

तसेच पुणे मार्केट परिसर आणि सिद्धिविनायक बँकेतही अहिल्यादेवींना अभिवादन करण्यात आले. विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना ग्रामस्थ, नागरिक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...



### खडकाळ गल्लीत 'मन की बात' कार्यक्रमाचे सामूहिक श्रवण

**तुळजापूर, दि.२ जून -**

शहरातील खडकाळ गल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे सामूहिक प्रसारण उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी मोदी यांचे विचार एकाग्रतेने ऐकले. यावेळी तुळजाभवानी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, तुळजापूर

पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे, 'मन की बात' जिल्हा संयोजक तथा आयुष्यमान भारत जिल्हा संयोजक धैर्यशील दरेकर, धनगर समाजाचे नेते दत्ता हुंडेकरी यांच्यासह महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कळंबमध्ये कौटुंबिक कार्यक्रमातील वादातून मारहाण

**कळंब, दि.२ जून -**

कळंब शहरातील कल्पना नगर परिसरात कौटुंबिक कार्यक्रमादरम्यान झालेल्या वादातून एका महिलेसह इतरांना मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ मे रोजी सायंकाळी कल्पना नगर पारधी पिढी येथे सुरू असलेल्या कार्यक्रमात जेवण वाढण्याच्या कारणावरून वाद झाला. यावेळी आरोपींनी फिर्यादी हिनाबाई राजेश पवार (वय २२, रा. मांग वडगाव, ता. केज, जि. बीड) व इतरांना शिवीगाळ करत मारहाण केल्याचा आरोप आहे. फिर्यादीनुसार, आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून लाथाबुक्यांनी तसेच दगड, बिअरची बाटली, लोखंडी पाईप आणि काठीने हल्ला करून जखमी केले.

या प्रकरणी सूरज तानाजी पवार, बिरु बप्पा पवार, अरुण सुभाष पवार, संत्या शिवराम पवार, कल्लू राजा पवार आणि सुभाष सुरेश पवार (सर्व रा. कल्पना नगर, कळंब) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# बेकायदेशीर विहीर व रस्त्याच्या तोडफोडीप्रकरणी ग्रामस्थ आक्रमक

### प्रशासनाला ७२ तासांचा अल्टिमेटम...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ जून -**

तालुक्यातील जकेकूर येथील सर्व्हे क्रमांक १८८/१ मधील कथित बेकायदेशीर विहीर, पाण्याचा व्यावसायिक उपसा आणि शेतकऱ्यांच्या रस्त्याची झालेली तोडफोड याप्रकरणी जकेकूर, जकेकूरवाडी, औराद व गुंजोटी येथील ग्रामस्थ आणि शेतकरी आक्रमक झाले आहेत.

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, उमरगा यांना निवेदन देत प्रशासनाने ७२ तासांत ठोस कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, एच. एस. के. केमिकल इंडस्ट्रीज एलएलपी या कंपनीचे भागीदार श्रेयस अजमेरा व इतरांनी सर्व्हे क्र. १८८/१ मध्ये बेकायदेशीररीत्या विहीर खोदून पाण्याचा व्यावसायिक वापर सुरू केला आहे. तसेच शेतकऱ्यांनी स्वखर्चातून तयार केलेल्या रस्त्याची व पाईपलाईनची तोडफोड केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

२८ मे रोजी जेसीबीच्या सहाय्याने विहिरीजवळ खोदकाम व रस्ता उकरण्याचे काम सुरू असताना ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित काम थांबविल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सध्या घटनास्थळी नुकसान झालेल्या रस्त्याचे व खोदकामाचे पुरावे जशास तसे असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. तक्रार करूनही महसूल प्रशासनाकडून अद्याप अधिकृत स्थळ पंचनामा




करण्यात आलेला नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. संबंधित विहीर सील करणे, कामबंदीचे आदेश देणे आणि नुकसानग्रस्त रस्त्याची पाहणी करून भरपाई देण्याबाबतही कोणतीही कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जकेकूर साठवण तलाव हा जकेकूर, जकेकूरवाडी, औराद आणि गुंजोटी या चार गावांच्या पिण्याच्या पाण्याचा व शेती सिंचनाचा प्रमुख स्रोत असल्याने या जलस्रोताचा व्यावसायिक वापर भविष्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण करू शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने स्थळ पंचनामा, विहीर सील करणे, बेकायदेशीर काम कायमस्वरूपी बंद करणे तसेच रस्त्याच्या नुकसानीची भरपाई मिळवून देण्याची मागणी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास उमरगा तहसील कार्यालयासमोर रस्ता रोको आंदोलन, अमरण उपोषण आणि अंतिम टप्प्यात जकेकूर साठवण तलावात सामूहिक जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनावेळी जिल्हा परिषद सदस्य शहाजी पाटील, विविध गावांचे सरपंच, पदाधिकारी, शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## राष्ट्रीय आईस हॉकी संघात 'जयप्रकाश'च्या आदिराज पवारची निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जून -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील इयत्ता अकरावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी आदिराज बाळासाहेब पवार याची राष्ट्रीय आईस हॉकी संघात निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयात त्याचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

आदिराज पवार हा आगामी राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार असून ही स्पर्धा १६ जून २०२६ रोजी उत्तराखंड राज्यातील डेहराडून येथे होणार आहे. यावेळी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास आण्णा कोळगे, माजी ग्रामपंचायत सदस्य राजनारायण कोळगे, विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, अमरसिंह गोरे, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आदिराजला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत कोळगे यांनी केले.

## मिरवणुकीत कर्णकर्कश डॉल्बी वाजविल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.२ जून -**

मिरवणुकीदरम्यान पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे उल्लंघन करून कर्णकर्कश आवाजात डॉल्बी डीजे साउंड सिस्टीम वाजविल्याप्रकरणी एकाविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मस्तान उर्फ सलमान एकबाल शेख (वय २१, रा. अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी ३१ मे रोजी सायंकाळी मिरवणुकीत वापरण्यात आलेले ध्वनीक्षेपक पोलीसांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार न वापरता वाहनावर डॉल्बी डीजे साउंड सिस्टीम लावून ध्वनीमर्यादेपेक्षा अधिक व कर्णकर्कश आवाजात वाजविल्याचा आरोप आहे.

## अणदूर बसस्थानकात एसटी महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२ जून -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन अणदूर बसस्थानकात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी घुगे यांच्या हस्ते वाहतूक नियंत्रक कार्यालय व बसचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना बालाजी घुगे यांनी एसटी महामंडळाने गेली अनेक वर्षे सुरक्षित सेवा व विश्वासाची परंपरा जपल्याचे सांगितले. सर्वसामान्य नागरिकांची नाळ एसटी सेवेशी जोडली गेली असून वर्धापन दिन प्रवाशांच्या साक्षीने साजरा करताना आनंद होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास उमरगा आगाराचे वाहतूक नियंत्रक अतुल बारभाई, कल्याणी मुळे, राजकुमार स्वामी, गुरुनाथ कबाडे, बसवेश्वर नरे यांच्यासह एसटी कर्मचारी, रिक्षा संघटनेचे कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## स्मशानभूमीचा पारंपरिक रस्ता खुला करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ जून -**

तालुक्यातील कोरेगाव येथील दलित समाजाच्या स्मशानभूमीकडे जाणारा जुना पारंपरिक रस्ता तातडीने खुला करून द्यावा, या मागणीसाठी सोमवारी शेकडो महिला-पुरुषांसह विविध सामाजिक व राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार गोविंद येरमे यांना निवेदन सादर केले.

रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते हरीश डावरे, वंचित बहुजन आघाडीचे रामभाऊ गायकवाड, सचिन माने, दगडू भोसले व वैजिनाथ सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, कोरेगाव येथील दलित समाजाची सुमारे ७०० लोकसंख्या असून गावातील मयत व्यक्तींवर अंत्यसंस्कार करण्यासाठी सर्वे क्रमांक १२ मधील स्मशानभूमीचा वापर केला जातो. या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी सर्वे क्रमांक १३/२ व १३/३ मधून शंभर वर्षांहून अधिक काळापासून पारंपरिक रस्ता अस्तित्वात आहे.

काही दिवसांपूर्वी एका अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना या रस्त्यावर अडविण्यात आल्याचा तसेच यापुढे या मार्गाने जाता येणार नसल्याचे सांगून रस्ता बंद करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून वापरात असलेल्या वहिवाटीच्या रस्त्यावर अडथळे निर्माण केल्याने दलित समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. स्मशानभूमीकडे जाणारा पारंपरिक रस्ता तातडीने खुला करून नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

यावेळी कोरेगावच्या सरपंच अलका सूर्यवंशी, राजेंद्र कांबळे, रमेश सूर्यवंशी, अंगद गायकवाड, शाहूराज गायकवाड, सौरभ सूर्यवंशी, दत्ता सूर्यवंशी, जीवन सूर्यवंशी, वैजिनाथ सूर्यवंशी, केरबा सूर्यवंशी, भास्कर सूर्यवंशी, बालाजी गायकवाड यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## तुळजापूर आगारात राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात

**रक्तदान व अन्नदान उपक्रमांचे आयोजन...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ जून -**

तुळजापूर येथील एसटी आगारात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. आगार व्यवस्थापक महेश रामपुरे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

जयंतीनिमित्त दिवसभर अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमासाठी भाऊसाहेब कावरे, तानाजी क्षिरसागर आणि सागर बादगुडे यांनी विशेष सहकार्य केले.

तसेच गोपाबाई दमानी ब्लड बँक, सोलापूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात ३१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदानासाठी महिला व पुरुषांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यावेळी महाराष्ट्र



शासनाच्या राज्यस्तरीय आरोग्यरत्न पुरस्काराचे मानकरी तानाजी क्षिरसागर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आबासाहेब सलगर, नितीन इंगळे, शंकर क्षिरसागर, म्हेसराज पटेल, प्रवीण हुंडेकर, समाधान शिंदे यांच्यासह तुळजापूर आगारातील चालक, वाहक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## बसस्थानक परिसरात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थासह युवकावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२ जून -**

कळंब बसस्थानक परिसरात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी बाळगल्याप्रकरणी एका युवकाविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्ता महेश कांबळे (वय २७, रा. इंदिरानगर, कळंब) हा १ जून रोजी रात्री कळंब बसस्थानकाच्या मोकळ्या जागेत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुमारे १,२०० रुपये किमतीचा तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगत असल्याचे आढळून आले. पोलीसांनी संबंधित तंबाखूजन्य साहित्य जप्त केले असून आरोपीविरुद्धगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत.

## कळंबमध्ये मुलींच्या व्हॉलीबॉल स्पर्धेचा उत्साहात समारोप



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२ जून -**

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त संकल्प व्हॉलीबॉल क्लब व फ्रेंड्स फॉरेव्हर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय मुलींच्या भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा समारोप उत्साहात झाला. विद्याभवन हायस्कूल मैदानावर झालेल्या स्पर्धेला क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेत मिलेनियम पुणे संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर लातूर स्पायकर्स बी संघ द्वितीय, लातूर स्पायकर्स ए संघ तृतीय आणि मुंबई पोलिस संघ चतुर्थ क्रमांकावर राहिला. विजेत्या संघांना चषक, सन्मानचिन्हे व रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

महिला खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण भागात क्रीडा संस्कृतीला चालना देणे हा स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. महाराष्ट्र राज्य रेफ्री बोर्डचे चेअरमन प्रा. विक्रम पाटील यांनी प्रमुख रेफ्री म्हणून काम पाहिले. समारोप व बक्षीस वितरण सोहळ्यास क्रीडाप्रेमी नागरिक, खेळाडू आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिव्यांग प्रवाशाला एसटीत अपमानास्पद वागणूक?

### महिला वाहकांवर कारवाईची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२ जून -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमध्ये दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या जागेवर बसण्यास नकार देत एका दिव्यांग प्रवाशाला कथित अपमानास्पद वागणूक दिल्याचा प्रकार कळंब बसस्थानकात घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे दिव्यांग प्रवासी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कळंब येथील दिव्यांग प्रवासी अशोक मानमोडे हे ३१ मे रोजी सकाळी कळंब-लातूर एसटी बसमध्ये प्रवासासाठी चढले होते. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या आसनावर बसण्याचा प्रयत्न करत असताना तेथे बसलेल्या प्रवाशाने त्यांना विरोध केल्याचे सांगितले जाते. याबाबत त्यांनी बसच्या महिला वाहकांकडे तक्रार केली. मात्र, त्यांचे म्हणणे ऐकून न घेता दुसऱ्या बसने प्रवास करण्याचा सल्ला देण्यात आला तसेच त्यांच्याशी उद्धटपणे वागण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.



ऑनलाइन तक्रार करण्याबाबत सांगितल्यानंतरही संबंधित कर्मचाऱ्यांनी दखल घेतली नसल्याचे मानमोडे यांनी म्हटले आहे. आरक्षित जागेवर बसलेल्या प्रवाशाला उठविण्याऐवजी दिव्यांग प्रवाशालाच त्रास सहन करावा लागल्याने उपस्थित प्रवाशांनीही नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात आले.

या घटनेमुळे दिव्यांगांच्या हक्कांबाबत एसटी प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. परिवहन मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवासी, सामाजिक कार्यकर्ते आणि दिव्यांग संघटनांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकरणाबाबत एसटी प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## तेरखेड्यातील दोन जिवलग मित्रांची भारतीय सेनेत अग्निवीर म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ जून -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील कुणाल जगन्नाथ खामकर आणि शिवम बाळासाहेब शिंदे या दोन जिवलग मित्रांची अग्निवीर योजने अंतर्गत भारतीय सेनेत निवड झाली आहे. सामान्य शेतकरी कुटुंबातील या युवकांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर हे यश संपादन केले आहे.



भारतीय सेनेत भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगून दोघेही नियमित सराव व तयारी करत होते.

शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच आवश्यक परीक्षा व निवड प्रक्रियेत यश मिळवत त्यांनी भारतीय सेनेत स्थान मिळविले.

कुणाल खामकर आणि शिवम शिंदे यांच्या यशामुळे तेरखेडा गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## समर्थ नागरी पतसंस्थेच्या चेअरमनपदी नारायण नन्नवरे



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ जून -**

तुळजापूर येथील समर्थ नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी नारायण नन्नवरे तर व्हाईस चेअरमनपदी संजय व्हटकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली.

पतसंस्थेची नुकतीच झालेली पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली असून संचालक मंडळाच्या सर्व ११ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

निवडणूक प्रक्रिया सहाय्यक निबंधक व्ही. एस. जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

त्यांना सहकार अधिकारी ए. व्ही. जाधव आणि संस्थेचे सचिव सज्जन जाधव यांनी सहकार्य केले.

## संक्षिप्त वृत्त...



### एमबीबीएस अंतिम परीक्षेत कौस्तुभ सूर्यवंशी यशस्वी

**तुळजापूर, २ जून -**

कौस्तुभ निता विष्णु सूर्यवंशी यांनी एमबीबीएसची अंतिम परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत असून नुकताच त्यांचा सत्कार करण्यात आला. कौस्तुभ यांनी शालेय शिक्षण धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये, तर उच्च माध्यमिक शिक्षण लातूर येथे पूर्ण केले. त्यानंतर हैदराबाद येथील भास्कर मेडिकल कॉलेज अँड जनरल हॉस्पिटल येथे वैद्यकीय शिक्षण घेतले. २०२० बॅचचे विद्यार्थी असलेल्या कौस्तुभ यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळविले. यशाबद्दल आयोजित सत्कार समारंभास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कौस्तुभ यांचे यश प्रेरणादायी ठरत असून मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे.



### जिल्हा न्यायालय परिसरात अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

**धाराशिव, २ जून -**

जिल्हा व सत्र न्यायालय परिसरात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात निवृत्त प्रा.ए.डी. जाधव यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यकारभार, प्रशासन आणि लोककल्याणकारी कार्यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. जाधव आणि जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. खंडेराव चौरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. संजय भोरे यांनी तर आभार ॲड. मैंदाड यांनी मानले. यावेळी उपाध्यक्ष ॲड. सुधीर नन्नवरे, सचिव बाळासाहेब आवड यांच्यासह ज्येष्ठ वकील, महिला वकील आणि विधिज्ञ उपस्थित होते.



### उमरग्यात खरीपपूर्व कार्यशाळेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**उमरगा, दि.२ जून -**

वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट आणि टाटा कम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २८ मे रोजी खरीपपूर्व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सेंद्रिय शेती, जलसंधारण, सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञान आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी सरपंच निवृत्ती पवार होते. मंडळ कृषी अधिकारी लक्ष्मिकांत फडणवीस, सहाय्यक कृषी अधिकारी सुनंदा सूर्यवंशी, कृषितज्ज्ञ अश्रुबा जाधव व आदेश ठोंबरे यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, ठिबक सिंचन, फळबाग लागवड आणि पाणी बचतीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी बियाण्यांची उगवण क्षमता तपासणीचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल ढवळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सामाजिक क्षेत्र अधिकारी खंडू पांढरे यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी किरण पवार, विनोद कांबळे, व्यंकट रेड्डी, वसुंधरा सेविका अश्विनी धनुरे यांनी सहकार्य केले.

## रायगडाच्या दिशेने तुळजाईचा आशीर्वाद...

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी तुळजाभवानी मातेचे कुंकू, १०८ कवड्यांच्या माळा रवाना

**शिरकाई देवीला साडी-चोळी अर्पण करण्याचा तुळजापूरला ऐतिहासिक मान**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ जून -**

रायगडावर ६ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात असताना, स्वराज्याचे कुलदैवत असलेल्या आई तुळजाभवानी मातेचा आशीर्वाद तुळजापूरहून रायगडकडे रवाना झाला आहे. देवीच्या चरणी पूजित झालेले कुंकू, १०८ अबुंकी कवड्यांच्या माळा तसेच गडदेवता शिरकाई देवीसाठी साडी-चोळी व ओटीचे साहित्य विधिवत पूजन करून रायगडकडे आज (दि.२) पाठविण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज आणि आई तुळजाभवानी यांचे नाते स्वराज्याच्या इतिहासाशी जोडलेले असल्याने दरवर्षी शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी तुळजाभवानी मातेच्या चरणी अर्पण केलेले कुंकू आणि कवड्यांच्या माळा रायगडावर पाठविण्याची परंपरा आजही भक्तिभावाने जपली जाते.

**तुळजापूरला लाभलेला ऐतिहासिक सन्मान....**

रायगडाची गडदेवता शिरकाई देवीला साडी-चोळी अर्पण करण्याचा मान प्रथमच तिर्थक्षेत्र तुळजापूरला लाभला आहे. शिवरायांच्या कुलस्वामिनी श्री तुळजाभवानीच्या नगरीला मिळालेला हा सन्मान तुळजापूरकरांसाठी अभिमानाचा क्षण मानला जातो. इतिहासानुसार छत्रपती शिवाजी महाराजांना आपल्या कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेसोबत चांदीच्या सिंहासनावर विराजमान होण्याचा अद्वितीय मान प्राप्त झाला होता. आजही नवरात्रोत्सवात भवानी तलवारीसह शिवरायांचा विशेष महाअलंकार साकारला जातो. त्याच ऐतिहासिक आणि भावनिक परंपरेचा धागा शिवराज्याभिषेक सोहळ्यातून पुन्हा एकदा दृढ होत असल्याचे मानले जाते.



यंदा राजसदरेवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी विशेष तयार करण्यात आलेली १०८ अबुंकी कवड्यांची माळ आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. याशिवाय जगदीश्वर मंदिर, शिरकाई देवी मंदिर, शिवरायांची समाधी, होळीवरील पुतळा तसेच पालखी सोहळ्यातील प्रतिमेसाठी स्वतंत्र माळांचाही समावेश आहे.

दि. २ जून २०२६ रोजी मंगळवारी झालेल्या पूजन कार्यक्रमास अप्पर जिल्हाधिकारी उपेंद्र तामोरे, मंदिर संस्थानचे विश्वस्त तथा नगराध्यक्ष विनोद गंगणे, व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने, शिवप्रेमी सतीश खोपडे, शिवशंकर म्हमाणे, गणेश भिंगा, अनिल आगलावे यांच्यासह अनेक शिवभक्त उपस्थित होते.

शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी तुळजापूरहून रवाना झालेले हे पूजित साहित्य म्हणजे स्वराज्याच्या राजधानीकडे निघालेला आई तुळजाभवानीचा आशीर्वाद असल्याची भावना शिवभक्तांनी व्यक्त केली.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जून -**

धाराशिव शहर पोलीस ठाण्यात एका ३७ वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपीने २०१९ पासून पीडित महिलेला लग्नाचे आश्वासन देत तसेच तिच्या मुलांचा सांभाळ करण्याचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. याशिवाय जातीवाचक शिवीगाळ करून पोलीसांकडे तक्रार केल्यास जीवे



मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

पीडित महिलेने १ जून २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध धाराशिव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## महिलेच्या गळ्यातील सोन्याची मिनीगंठण लंपास

**धाराशिव, दि.२ जून -**

तुळजापूर बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची मिनीगंठण चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वाती लहु माळी (वय ३७, रा. बार्शी, जि. सोलापूर) या १ जून २०२६ रोजी दुपारी सोलापूर-नांदेड बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या गळ्यातील सुमारे २७ ग्रॅम वजनाचे व अंदाजे ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनीगंठण लंपास केले.

## ईट-डोकेवाडी रस्त्यावर दुचाकींची समोरासमोर धडक; एकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२ जून -**

भूम तालुक्यातील ईट-डोकेवाडी रस्त्यावर सोमवारी सायंकाळी दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला, तर दोघे जण गंभीर जखमी झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, नागेवाडी येथील बाबासाहेब चांगदेव लांडे (वय ३८) व सचिन आश्रू चव्हाण (वय ३०) हे दुचाकीवरून डोकेवाडीकडून नागेवाडीकडे जात होते. त्याचवेळी डोकेवाडी येथील कृष्णा चंद्रभान गडराव (वय ४२) हे स्वतःच्या दुचाकीवरून डोकेवाडीकडे परत येत होते. ईट-डोकेवाडी मार्गावरील पांढरेवाडी फाटयाजवळील उताराच्या वळणावर दोन्ही दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली.



या अपघातात बाबासाहेब लांडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तातडीने बार्शी येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच वाटेत त्यांचा मृत्यू झाला. सचिन चव्हाण हे जखमी असून त्यांच्यावर बार्शी येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

तर कृष्णा गडराव यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी बीड येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## 'वीज द्या, नाहीतर आंदोलन!' ; संतप्त शेतकऱ्यांचा महावितरण कार्यालयाला घेराव



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ जून -**

वाशी तालुक्यातील तांदळवाडी, महालदारपुरी, जवळका आणि शेंडी या गावांतील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

वीजपुरवठा खंडित होत असल्याने जनावरांच्या पाण्याचा प्रश्न तसेच गावांतील पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

महावितरण प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी १ जून रोजी वाशी येथील महावितरणच्या उपविभागीय कार्यालयावर धाव घेत निवेदन सादर केले. शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी काही लोकप्रतिनिधी व ग्रामस्थही यावेळी उपस्थित होते.

मात्र, उपकार्यकारी अभियंता कार्यालयात अनुपस्थित असल्याने शेतकरी व लोकप्रतिनिधींना तब्बल दोन तास प्रतीक्षा करावी लागली. त्यामुळे उपस्थितांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले. अधिकारी कार्यालयात आल्यानंतर संतप्त शेतकऱ्यांनी त्यांना घेराव घालत वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत जाब विचारला.

यावेळी तांदळवाडी, महालदारपुरी, जवळका आणि शेंडी या चारही गावांसाठी स्वतंत्र वीज फिडर मंजूर करून वीजपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याची मागणी करण्यात आली. यावर उपकार्यकारी अभियंत्यांनी तीन दिवसांत वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

मात्र, हे केवळ वेळकाढूपणाचे आश्वासन असल्याची भावना व्यक्त करत, येत्या तीन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी व ग्रामस्थांनी दिला. त्यामुळे चारही गावांतील वीजप्रश्न आता अधिकच ऐरणीवर आला आहे.

## जनतेच्या विविध प्रश्नांसाठी निवेदन; तातडीच्या उपाययोजना करा : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जून -**



जिल्ह्यातील नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये मूलभूत सुविधा, शासकीय योजनांमधील अडचणी तसेच जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध लोकहिताच्या प्रश्नांचा समावेश होता.

निवेदनाद्वारे वाढती महागाई, पेट्रोल-डिझेल व घरगुती गॅसच्या वाढत्या किमती, बेरोजगारी, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी, रखडलेली विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, वीज व महसूल विभागाशी संबंधित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांची नावे वगळली जाणे, केवायसी प्रक्रियेतील अडथळे आणि त्यामुळे लाभार्थी महिलांना योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याची बाबही निदर्शनास आणून देण्यात आली. पात्र महिलांना अखंडित लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, मसूद शेख, नगरसेवक बबलूभाई शेख, पंकज भोसले, सर्फराज कुरेशी, एजाज काझी, विशाल शिंगाडे, सुनील आंबेकर, अन्वरभाई शेख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वादळी पावसाचा वाशी तालुक्याला तडाखा; दसमेगाव शाळेचे पत्रे उडाले

**शेतकऱ्यांचे मोठे नुकसान...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ जून -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने मोठा तडाखा दिला असून वाशी, दसमेगाव, दळवेवाडी, गोजवाडा, घोडकी, पिंपळगाव आणि सारोळा परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जनावरांच्या गोठ्यांवरील पत्रे उडून गेली, तर चारा व शेती साहित्य साठवण्यासाठी उभारलेले पत्र्याचे शेड कोसळल्याने आर्थिक फटका बसला आहे.







वादळामुळे अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे उन्मळून पडली असून इंदापूर-गोजवाडा मार्गासह विविध रस्त्यांवरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. काही भागांत वीजपुरवठाही खंडित झाल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला.

या नैसर्गिक आपत्तीचा सर्वाधिक फटका दसमेगाव येथील जिल्हा परिषद शाळेला बसला. शाळेच्या इमारतीवरील संपूर्ण पत्रे उडून गेली असून मोठी झाडे कोसळल्याने इमारतीचे मोठे नुकसान झाले आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असताना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

नुकसानग्रस्त भागाची पाहणी गटशिक्षणाधिकारी सोमनाथ घोलप, डीसीसी बँकेचे व्हाईस चेअरमन केशव सावंत, जिल्हा परिषद सदस्य विकी चव्हाण, पंचायत समिती उपसभापती नितीन रणदिवे, शिवसेना नेते नागनाथ नाईकवाडी, प्रवीण उंदरे, प्रवीण गायकवाड, सरपंच पोपट मोरे आणि सत्यवान गपाट यांनी केली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, शिवसेना कार्यकर्त्यांनी माजी मंत्री तथा आमदार तानाजीराव सावंत यांना दूरध्वनीद्वारे परिस्थितीची माहिती दिली.

शाळेच्या दुरुस्तीसाठी आवश्यक मदत तातडीने उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येणार नाही यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याचे सांगितले.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून तातडीने आर्थिक मदत द्यावी तसेच दसमेगाव जिल्हा परिषद शाळेची दुरुस्ती युद्धपातळीवर करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.